वाचाः- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७.

२ महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा(सेवाप्रवेश) नियम १९६७ दुसरी दुरुस्ती नियम १९९२राजपत्र दि ३/०३/१९९२

३.महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई-३२ कडिल शासन निर्णय क्र एपीटी-१००१ / प्र.क्र.९६०/आस्था-८ दि २७/०६/२००३

४.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई-३२कडिल शासन निर्णय क्र प्रानिम-२००७/ प्र.क्र.४६/०७ १३ अ ,दि १९/१०/२००७

५.शासनपत्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र एपिटी-२००७/प्र.क्र.२६/आस्था-८ दि १४/१२/२०१०

६ ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र एपीटी- .२००७ /प्र.क्र २६ आस्था-८ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १४/१२/२०१० नुसार नवनिर्मीत पंचायत समित्यांनकरिता सुधारीत आकृतीबंधानुसार विस्तार अधिकारी (कृषि) पदे

७.कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र कृआ/जिप/पआ/आस्था-५/(निप)/४००/२०११ दि ३०/११/२०११

८.शासनपत्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र एपिटी-२०११/प्र.क्र.११९/आस्था-८/दि २९/०९/२०११ व परिपत्रक क्र एपीटी-२००९/प्र.क्र ३५३२/आस्था-८दिनांक १७/१२/२००९

९ वित्त विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र असक-१०१०/प्र.क्र.१/२०१० वित्त सुधारणा-१दि ०५/०६/२०१० व ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्र एपीटी-२०१२/प्र.क्र.१४३/आस्था-८दिनांक ०७/०४/२०१२

१०.ग्रामविकास विभाग मुंबई म.शासन निर्णय.क्र.डिएसआर-२०१९/प्र.क्र.१६/आस्था-५ दि ०६/०३/२०१९

११.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शानि.क्र प्रानिम-१२२२/प्र.क्र.५४/का/१३-अ दि ४ मे २०२२

१२.मा.सहाय्यक आयुक्त(मावक) नाशिक यांचेकडिल बिंदुनोंदवही तपासणी दि ०८/१२/२०२२

१३. वित्त विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र वेपुर ११२१/प्रक्र.०४/सेवा-९ दि १३/०२/२०२३

१४ जिल्हा परिषद जळगांव विविध संवर्गाची पद भरती जाहिरात क्र ०१/२०२३

१५.आय.बी.पी.एस. कडून प्राप्त निकाल व दि ०२/०२/२०२४ रोजी प्रसिध्द तात्पुरती गुणवत्ता निवड यादी व प्रतिक्षाधीन यादी

१६.जि.प.जळगांव सरळसेवा पदभरती २०२३ कागदपत्र पडताळणी दि १४/०२/२०२४

१७.अंतिम निवड यादी व जिल्हा निवड समिती इतिवृत्त

---

**नेमणुक आदेश**

जाक्र/कृषी/आस्था-१/आरआर/ ९७ /२०२४.
कृषी विभाग, जिल्हा परिषद, जळगाव.
दिनांक :- ११ /03 /२०२४.

उपरोक्त वाचा मध्ये नमूद शासन संदर्भ नियम,जिल्हा निवड समिती इतिवृत्त,प्रसिध्द जाहिरात अटी शर्ती त्यात नमुद नियम,आय.बी.पी.एस.कडिल प्राप्त गुणवत्ता यादी व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ नुसार मला असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव खालील नमूद उमेदवार यांना जिल्हा सेवा (वर्ग-३)श्रेणी-२ मधील 'विस्तार अधिकारी (कृषि)' या पदावर समय वेतनश्रेणी मॅट्रीक्स (एस-१४) रु. ३८६००-१२२८०० या वेतन संरचनेत खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणूक करीत असून त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहे. सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची आहे.

| अ क्र | नेमणुक झालेल्या उमेदवाराचे नाव व पत्ता | जात प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | शुभम अरुणराव पडलमवार<br>एच-३५,विदर्भ प्रिमियम नगर,जुना बायपास रोड एमआयडीसी ,अमरावती,जि.अमरावती, पिन-४४४६०६ | भ.ज.व | भ.ज.व | विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती. बोदवड |
| २ | गौरव सुभाषलाल पोखरना<br>मु.पो.वेल्हे,ता.जुन्नर,जि.पुणे,पिन-४१२४१० | ई.डब्ल्यू.एस | ई.डब्ल्यू.एस | विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती. चाळीसगांव |
| ३ | अविनाश शामसुंदर परिहार<br>राणा निवास,आदर्श कॉलनी,चिखली रोड,देऊळगावराजा ता.देऊळगांवराजा,जि.बुलढाणा पिन- ४४३२०४ | वि.जा.अ. | वि.जा.अ. | विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती. जामनेर |
| ४ | रिमा रविदास गावित<br>३२,भाग्योदय नगर,वाघोदे शिवार,नंदुरबार ता.जि.नंदुरबार, पिन-४२५४१२ | अ.ज | अ.ज | विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती. पाचोरा |

२...

Scanned with CamScanner

सदर नेमणूक ही खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

१) सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारांस नोटीसीशिवाय कोणतेही कारण न दाखवता केव्हाही जिल्हा परिषद जळगावचे सेवेतून कमी करण्यात येईल अशी आहे.

२) सदर पद शासनाने मंजूर केलेल्या आकृती बंधानुसार असून सदर पदाचे वेतन व भत्याचा खर्च हा शासकीय मंजूर अनुदानातून करणेत यावा.

३) सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीस(३०) दिवसांचे आत नियुक्तीच्या कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे. दिलेल्या मुदतीत हजर झाले नाहीत, तर त्यांची नेमणूक रद्द करणेत येईल.

४) सदर उमेदवारास सदर नेमणुकीच्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगावचे जिल्हा निधीत चलनाद्वारे जमा करून जमा चलनाची प्रत सादर केल्यावरच राजीनामा मंजूर केला जाईल.गैरशिस्त,सेवानियमांचा भंग इ.कारणासाठी सेवा समाप्त करतांना वरील उमेदवांराना नोटीस देण्याचे जिल्हा परिषदेला बंधनकारक राहणार नाही.

**५) अ.क्र.०२ चे उमेदवार श्री. गौरव सुभाषलाल पोखरना व अ.क्र ०३ चे उमेदवार श्री.अविनाश शामसुंदर परिहार यांचे प्रमाणपत्राबाबत लेखी आक्षेप प्राप्त आहेत.** भविष्यात संबधित प्रमाणपत्रे अवैध ठरल्यास अवैध ठरलेल्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करणेत येईल. उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र, (मागासवर्गीय असलेस व राखीव जागेवर निवड झालेलीअसलेस) व सादर केलेले इतर कागदपत्र अवैध/चूकीचे आढळल्यास त्यांना जिल्हा परिषद सेवेतून कमी करणेत येवून त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

६) सदर नियुक्ती मिळणेपूर्वी उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत असल्यास त्या पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे. तसे मंजूरीचे पत्र हजर होतांना सादर करावे. तसेच अश्या उमेदवारांनी सदर पदासाठी अर्ज करतांना सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेतली असलेस ती प्रत व कार्यमुक्तता प्रत हजर होतांना सादर करावी व शासन नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मुदतीत हजर व्हावे व तसा अहवाल सादर करावा.

**७) निवड झालेल्या उमेदवारानी संबधित मा. पोलीस अधिक्षक यांचेकडून पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी प्रमाणपत्र एक महिन्याचे आत प्राप्त करुन घ्यावे. सदर पडताळणीत आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवारांची नेमणुक रद्द करुन त्यांची सेवा संपुष्टात येईल.त्याबाबत संवर्ग प्रमुख यांनी वेळीच पत्रव्यवहार प्रक्रिया पुर्ण करावी.**

८) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

९) संबंधीत कार्यालय प्रमुखांनी सदर उमेदवारांना हजर करुन घेतांना त्यांची जन्मतारिख, शैक्षणिक अर्हता,जातीचे प्रमाणपत्र,जात वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय असलेस) इ.माहिती दर्शविणारी सर्व मुळ कागदपत्रे तपासणी करुन घ्यावीत.

१०) शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार सदर उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना शासनाचे प्रचलित धोरणानुसार त्यांना लागू राहणार नाही.वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र. ३४/सेवा-४ दि. ३१ मार्च २०२३ नुसार उमेदवाराला विकल्प सादर करावयाचा आहे.

**११)सदर उमेदवारांनी नेमणुकीचे जागी हजर झाल्यावर एक महिन्याचे आत मा.जिल्हा शल्यचिकित्सक,जळगांव यांचेकडून वैद्यकिय तपासणी करुन घेवून जिल्हा परिषद सेवेतील नेमणूकीच्या पदावर सेवेसाठी शारिरीक दृष्टया पात्र असले बाबतचा वैद्यकिय दाखला सादर करणे आवश्यक आहे.त्याबाबत संबंधीत कार्यालय प्रमुखांनी वेळीच योग्य ती कार्यवाही करावी.**

१२)संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी त्यांचेकडे नेमणूक झालेल्या उमेदवारास हजर करुन घेतल्या नंतर त्यांचेकडील सर्व मुळ प्रमाणपत्र तपासून कोणत्याही प्रकारची अडचण किंवा त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. उदा.-जन्मतारीख, जातीचा दाखला, मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जातीचे वैधता प्रमाणपत्र, वचनपत्र (नियमानुसार लागू असतील ते) इ.तपासून वेतन अदा करावे व त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

१३)उमेदवारांची नेमणूक एक वर्षाचे शिकावू कालावधीसाठी करणेत येत आहे. तथापी सदर कालावधीत त्यांचे कामकाज समाधानकारक नसल्यास शिकावू कालावधी पुढे वाढविण्यात येईल.

१४)मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत त्यांना जातीच्या प्रमाणपत्राचे वैधतेच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बी.सी.सी.२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार सदर उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणत्राची तपासणी करून घेणे व त्यासाठी सर्व कागदपत्रांची पुर्तता करून देण्याची जबाबदारी सर्वस्वी संबधित कर्मचा-यांची राहिल. पडताळणीअंती जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे आढळून आले अथवा वैध प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्यास संबधित कर्मचा-यांची सादर पदावरील नेमणूक रद्द करून , त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जातील याची नोंद घ्यावी. याबाबत प्रतिज्ञापत्र रू १००/ चे स्टॅम्पपेपरवर हजर होतेवेळी कार्यालय प्रमुखांकडे करून द्यावयाचे आहे.

Scanned with CamScanner

१५)सदर उमेदवारांनी हजर झाले नंतर तीन महिन्यांचे आंत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहित नमुन्यातील आवश्यक ते विवरणपत्र संबंधीत कार्यालय प्रमुखांचे समक्ष भरुन देणे आवश्यक आहे. सदर विवरणपत्र संबंधीताच्या मुळ सेवा पुस्तकांत डकविण्यात यावे.

१६)वरील उमेदवाराला वेळोवेळी **निर्धारित शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.** सदर उमेदवाराला महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ नियम ४ मधील तरतुदीनुसार सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व शासन निर्णय/ इतर प्रशिक्षण विभागीय परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण/पूर्ण करणे बंधनकारक राहील.

१७)शासनाने विहित केलेली संगणक पात्रता परीक्षा पास केलेली नसलेस दोन वर्षाचे आंत उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.त्यांनी शासन विहित संगणक पात्रताधारण केली असल्यास मुळ प्रमाणपत्र हजर होतांना संबंधीत कार्यालय प्रमुखांकडे सादर करावे.व तशी नोंद सेवा पुस्तकात घेणेत यावी.

१८)शासनाचे निर्धारीत आकृतीबंधानुसार व शासनाचे अंतिम आढाव्यानुसार सदरचे पद कमी झाल्यास नेमणूक दिलेले उमेदवार नियमानुसार सेवेतून कमी करण्यास अथवा अन्य योग्य त्या पदावर समायोजन करण्यास पात्र राहातील

१९)लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र, इतर वचनपत्र शासन निर्णयानुसार प्रमाणीत करून देणे बंधनकारक राहिल. सदरचे प्रमाणपत्र विहित नमून्यात घेवून मूळ सेवापुस्तकात नोंदविण्यात यावे.

२०)संबंधीत उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालय प्रमुखांकडे हमीपत्र भरुन देणे आवश्यक आहे. सदरचे हमीपत्र संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात चिटकविण्यात यावे.

## हमीपत्र

मी -------------------------------- राहणार----------------- हमीपत्र लिहून देतो की, माझी जळगांव जिल्हा परिषदेच्या विस्तार अधिकारी (कृषि) या पदासाठी नेमणूक झालेली आहे. सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असून माझी सेवा मला पूर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला जाणीव असुन त्या तत्त्वावर मी नेमणूक स्वीकारीत आहे. सदर पदावर किमान ३ वर्ष सेवा पूर्ण केल्या शिवाय अन्य जिल्हा परिषमध्ये बदलीने नेमणूक बाबत मला अर्ज करता येणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. सदर आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, सर्व अटींशी मी सहमत व बांधील आहे.

**समक्ष**

**कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी, हुद्दा व दिनांक** **उमेदवाराची स्वाक्षरी**

सदरचे आदेशाची नोंद सर्व संबंधीतांचे मुळ सेवापुस्तकांत घेण्यात येवून सदर आदेशांची शासन नियमांनुसार तातडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेशा नुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

11/3/24

**अंकित (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

**प्रत.- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

१. संबंधीतांस पोष्टाव्दारे
२. म.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती जळगांव यांना सविनय सादर
३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना माहितीस्तव
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.जळगांव यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि) जि.प.जळगांवयांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ---------------- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना.

२/- उपरोक्त आदेशात नमूद अटीनुसार पूर्तता व योग्यत्या हमीपत्र व कागदपत्रांची पूर्तताकरुन संबंधीतांना हजर करुन घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

11/3/24

**अंकित (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

Scanned with CamScanner